दैनिक
wwww.lokaarambh.com
# लोक आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com

बीड | वर्ष - ०४ थे | अंक १३० | बुधवार ६ मे २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रू

Beed | year - ०4 th | Issue130 | Wednesday 6 May 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# नंदूरबारमध्ये बर्ड फ्ल्यूची धास्ती: चिकन, अंड्याच्या विक्रीवर बंदी, पोल्ट्री व्यवसाय संकटात

नंदूरबार जिल्ह्याला पुन्हा एकदा बर्ड फ्ल्यूचा विळखा पडला आहे. जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात बर्ड फ्ल्यूमुळे पोल्ट्री व्यवसायच संकटात आला आहे. राज्याच्या इतर भागात बर्ड फ्ल्यूची लागण होऊ नये म्हणून प्रशासनाने युद्धपातळीवर काम सुरू केलं आहे. गेल्या दोन दिवसात पावणे दोन लाख कोंबड्या ठार मारून नष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच 8 लाख अंडेही नष्ट करण्यात आले आहेत. या शिवाय नवापूर तालुक्यात चिकन आणि अंडीच्या विक्रीवर तात्काळ बंदी घालण्यात आली आहे.

नवापूर तालुक्यात एकूण 38 पोल्ट्री फार्म आहेत. त्यापैकी 27 पोल्ट्री फार्म चालू आहेत. यात लाखो पक्षी आहेत. ज्या पोल्ट्री फार्ममध्ये बर्ड फ्ल्यू पसरला आहे, त्याच्या एक किलोमीटरच्या परिघातील पक्ष्यांना मारण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. दिवसाच नव्हे तर रात्री उशिरापर्यंत कोंबड्या मारण्याचे आणि अंडी नष्ट करण्याचे काम सुरू आहेत. एकट्या शनिवारीच 33 हजार कोंबड्या ठार करण्यात आल्या होत्या. नियमानुसार, पोल्ट्री फार्माशी संबंधित पक्षी, अंडी, पक्ष्यांच्या खाद्याचा स्टॉक,



त्यांचे पंख आदी गोष्टी नष्ट केल्या जात आहेत. बर्ड फ्ल्यूचा संसर्ग रोखण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने कोंबड्या नष्ट केल्या जात आहेत. 100 हून अधिक कर्मचारी नियुक्त पशुपालन विभागाने ही मोहीम राबवण्यासाठी 100 हून अधिक अधिकारी, कर्मचारी, पशु चिकित्सक आणि सहायक कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. नाशिकवरूनही विशेषज्ञांची एक टीम नवापूरला आली आहे. तसेच नवापूरमधील संपूर्ण प्रभावित परिसर सील करण्यात आला आहे. डिसइन्फेक्शन, निरीक्षण, सर्वेक्षण, रहादरी आणि देवाणघेवाण या सर्वांवर कठोर निर्बंध आणले गेले आहेत. प्रभावित परिसरातील एक किलोमीटरच्या आतील कोंबड्या मारण्याचे काम सुरू आहे. तर 10 किलोमीटर परिसरात सर्वेक्षणाचं काम सुरू करण्यात आलं आहे. आधी धसका, मग निर्णय नवापूर नगर परिषद प्रशासनाने तालुक्यातील अंडी, चिकन आणि बिर्याणीवर प्रतिबंध घातला आहे. त्याचा थेट परिणाम हॉटेल, चिकन सेंटर आणि अंडी विक्रेते तसेच किरकोळ विक्रेत्यांवर झाला आहे.

# मार्कडवाडी या ठिकाणी मार्कड परिवार व झारगड परिवाराचा शाही विवाह सोहळा संपन्न.

## राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री महादेव जानकर यांची या विवाह सोहळ्याला उपस्थिती

बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी
शिरूर कासार तालुक्यातील मार्कड वाडी या ठिकाणी. माऊली महाराज मार्कड राष्ट्रीय समाज पक्ष आष्टी शिरूर कासार विधानसभा अध्यक्ष यांच्या मुलीचा विवाह सोहळा मार्कडवाडी या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. या विवाह सोहळ्याला उपस्थित राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री महादेवजी जानकर साहेब यांनी नववधूवरांना शुभेच्छा दिल्या. यावेळी स्वतः जानकर साहेबांनी अंतर पाट धरला . यावेळी वारकरी संप्रदायातील संत महंत या विवाह सोहळ्याला उपस्थिती होते, यावेळी, ह भ प महंत गुरुवर्य स्वामी जनार्दन महाराज गुरु निगमानंद महाराज ,मच्छिंद्र गडकर ह ,भ ,प महंत गुरुवर्य स्वामी संभाजी महाराज उत्तर अधिकारी नारायणगड, ह ,भ प महंत गुरुवर्य उद्धव महाराज शास्त्री श्री क्षेत्र संस्थान निगमानंद बाबा माळेवाडी नांदेवली ,ह ,भ ,प महंत गुरुवर्य स्वामी योगीराज महाराज रामगडकर ,ह भ प महंत गुरुवर्य स्वामी सुरेशानंद महाराज श्रृंगऋषी संस्थान शिंगारवाडी ,ह भ प महंत गुरुवर्य स्वामी बालाजी महाराज श्रीराम संस्थान तिंतरवणी ,ह भ प वर्षाताई काळे बीड, डॉ भारतजी



झारगड साहेब अध्यक्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ ,सौ सखु ताई भारत झारगड पंचायत समिती सदस्य पैठण, डॉ,नितीनजी उगले शिव कमल हॉस्पिटल बीड ,आमदार सुरेश आण्णा धस यांचे पुतणे श्याम अप्पा धस विविध गावचे सरपंच उपसरपंच सेवा सोसायटी चेअरमन उप चेअरमन जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य
आधी राजकीय सामाजिक शैक्षणिक पत्रकरिता क्षेत्रातील मान्यवरांची खूप मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती, व राष्ट्रीय समाज पक्षाचे कार्यकर्ते महाराष्ट्रातून या विवाह सोहळ्याला उपस्थित होते यावेळी या विवाह सोहळ्याला पंचक्रोशीतील नातेवाईकांची खूप मोठ्या प्रमाणात गर्दी बघायला भेटली यावेळी माऊली महाराज मार्कड यांनी सर्व नातेवाईकांचे आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे सर्वांचे आभार मानले,

# घाटनांदूर परिसरात दुर्दैवी घटना; विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

घाटनांदूर (ग्रामीण प्रतिनिधी):परिसरात अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून,विजेच्या जोरदार धक्क्याने एका तरुणाचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार,नजीर खदीर सय्यद (वय २५) हा तरुण घरातील कुलरमध्ये पाणी भरत असताना अचानक विजेचा जबरदस्त धक्का बसला.या घटनेत तो गंभीर जखमी झाला.तात्काळ त्याला उपचारासाठी स्वा.रा.ती शासकीय रुग्णालय,अंबाजोगाई येथे हलविण्याचा प्रयत्न करण्यात आला,मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.



मृत नजीर सय्यद हा बांधकाम कामगार म्हणून काम करत असे.त्याच्या पश्चात पत्नी व एक चिमुकली मुलगी आई-वडील,भाऊ–भाऊजई असा एकत्रित मोठा परिवार आहे.घरातील कर्ता व्यक्ती अचानक गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे संपूर्ण घाटनांदूर परिसरात हळहळ व्यक्त होत असून,नागरिकांनी शोक व्यक्त केला आहे.विजेच्या उपकरणांचा वापर करताना अधिक काळजी घेण्याचे आवाहनही यानिमित्ताने करण्यात येत आहे. यामध्ये एक दगड थेट उपनिरीक्षक भवर यांच्या छातीला लागला. दगडफेक सुरू असतानाच राहुल हजारी, अमित सद्देवाल आणि मोहन रहिकवाल हे दुचाकीवरून फरार झाले, तर अमित तिवारी आण ि सुजय चव्हाण यांना पोलिसांनी पाठलाग करून पकडले. धारूर पोलीस या पाचही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार मुकुंद ढाक हे करत आहेत.



# 'नैतिकदृष्ट्या टीएमसी जिंकली, मी राजीनामा देणार नाही',

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पुदुचेरीच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल ४ मे रोजी जाहीर झाले. या निवडणुकीत सर्वाधिक चर्चा ही पश्चिम बंगालची झाली. भाजपाने पश्चिम बंगालमध्ये बहुमत मिळवलं असून आता पश्चिम बंगालमध्ये भाजपा सरकार स्थापन करणार आहे. पश्चिम बंगालच्या निवडणुकीत टीएमसीला मोठा धक्का बसला आहे. ममता बॅनर्जी यांचाही पराभव झाला आहे. दरम्यान, या सर्व घडामोडीनंतर ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषद घेत भाजपा आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना ममता बॅनर्जी यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. 'नैतिकदृष्ट्या टीएमसी जिंकली आहे, तर मी राजीनामा का देऊ?', असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे मला अतिशय खेदाने हे सांगावं लागत आहे की लोकांचे घटनात्मक हक्क आणि ईव्हीएम लुटून निवडणूक आयोग या पश्चिम बंगालच्या निवडणुकीत खलनायक बनलं आहे. मला सांगा मतदानानंतर ईव्हीएम ८० ते ९० टक्के चार्ज कसे? हे जरा तुम्ही मला सांगू शकाल का? खरंच हे कसं शक्य आहे?", असा सवाल ममता बॅनर्जी यांनी केला आहे. "पश्चिम बंगालच्या निवडणुकीच्या दोन दिवस आधी त्यांनी आमच्या अनेक लोकांना अटक करायला सुरुवात केली. अनेक ठिकाणी त्यांनी छापे टाकले. एवढंच नाही तर अनेक आयपीएस आणि आयएएस अधिकाऱ्यांनाही बदललं, त्यांनी त्यांच्या मर्जीतील लोकांना त्या ठिकाणी नेमलं आणि भाजपाने थेट निवडणूक आयोगाशी संगनमत करून हा खेळ खेळला. भाजपा आणि निवडणूक आयोग यांच्यातील हा खेळ आहे. मात्र, तरीही आम्ही संपूर्ण यंत्रणेविरुद्ध लढलो", असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे. "पंतप्रधान आण ि केंद्रीय गृहमंत्री देखील यामध्ये सामील असून थेट हस्तक्षेप करत आहेत. त्यांनी एसआय आरच्या माध्यमातून तब्बल ९० लाख नावं वगळली आहेत. त्याविरोधात जेव्हा आम्ही न्यायालयात गेलो, तेव्हा ३२ लाख नावांचा त्यात समावेश करण्यात आला. त्यांनी घाणेरडं आण ि नीच राजकारण केलं. मी माझ्या आयुष्यात अशा प्रकारची निवडणूक कधीही पाहिली नाही", असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे.

# खांडवी परिसरात महावितरणचा गलथान कारभार,

## महावितरणचे कर्मचारी करतात तरी काय, लाईट वेळेवर नाही शेतकऱ्यांचे प्रचंड हाल, अजय शेजुळ



बीड गेवराई प्रतिनिधी ,अंकुश गवळी
गेवराई तालुक्यातील खांडवी परिसरामध्ये गेल्या पंधरा दिवसापासून महावितरणचा गलतन कारभार चव्हाट्यावर आल्याचे दिसून येत आहे, शेतकऱ्यांनी शेतामध्ये भरपूर काही पिके शेतामध्ये लावलेले आहेत ऊस कांदा बाजरी ज्वारी उन्हाळी पिके सध्या शेतकरी घेत आहेत महावितरण चा गलतान कारभार याप्रसंगी दिसून येत आहे वेळेवर लाईट येत नाही सध्या प्रचंड उन्हाळ्याच्या दिवसात ऊन पडत आहे लाईट नसल्यामुळे पाणी येत नाही सध्या मुख्य जनावरांचे प्राण्यांचे सर्वसामान्य जनतेचे हाल होताना दिसून येत आहेत,त्यामुळे महावितरणचे कर्मचारी करतात तरी काय महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी वेळेवर खांडवी परिसरामधला वीज पुरवठा सुरळीत करण्यात यावा, अन्यथा महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या विरोधात आमरन उपोषण करणार असल्याचा इशारा खांडवी गावचे युवा नेतृत्व तथा सामाजिक कार्यकर्ते अजय शेजुळ यांनी दिला आहे,

# सिंदफणा शाळेचे सीबीएसई रिडिंग चॅलेंजमध्ये सुयश चार विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी

माजलगाव (प्रतिनिधी):
माजलगाव येथील सिंदफणा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) रिडिंग चॅलेंज २०२५–२६ या उपक्रमात उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, आकलनक्षमता वृद्धिंगत करणे तसेच चिकित्सक आणि तर्कशक्ती विकसित करणे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.
इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या उपक्रमात देशभरातील सीबीएसई संलग्न शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. या उपक्रमात कोणतेही शुल्क आकारले जात नाही, ही विशेष बाब आहे. ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२५ या कालावधीत दोन टप्प्यांत ही स्पर्धा घेण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात शाळास्तरावर ऑफलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात आली. या फेरीत विद्यार्थ्यांच्या वाचनगती, आकलन, विश्लेषण व विचारशक्तीची कसोटी पाहण्यात आली. या फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करून दुसऱ्या टप्प्यासाठी नामनिर्देशन करण्यात आले. दुसरी फेरी ही सीबीएसईच्या अधिकृत संकेतस्थळावर


यशस्वी लक्ष्मण निंबाळकर


अभिरा देशमुख


शिवांजली सोळंके


अंशुमन राठोड

ऑनलाइन पद्धतीने पार पडली आहे. सिंदफणा पब्लिक स्कूलच्या पुढील चार विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर विशेष प्राविण्य मिळविले आहे— अभिरा रवी देशमुख – इंग्रजी गट यशस्वी लक्ष्मण निंबाळकर – इंग्रजी गट शिवांजली प्रविणकुमार सोळंके – हिंदी गट अंशुमन अविनाश राठोड – हिंदी गट
या विद्यार्थ्यांनी दोन्ही टप्प्यात उत्कृष्ट यश मिळवले त्याबद्दल सीबीएसई कडून त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले आहे . त्यांच्या या यशामुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावला असून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे व शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे हे फलित मानले जात आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वाचनातून माहितीचे सखोल विश्लेषण करण्याची, तर्कशुद्ध निष्कर्ष काढण्याची तसेच मजकुराची उपयुक्तता व विश्वासार्हता तपासण्याची संधी मिळते. दुसऱ्या टप्प्यात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सीबीएसईतर्फे ऑनलाइन सहभाग प्रमाणपत्र दिले असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष प्रशस्तीपत्र प्रदान केले आहे.
या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष विरेंद्र सोळंके, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य सुवर्णा शिंगणे, सौदागर साखरे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. तसेच भविष्यातही अशा शैक्षणिक उपक्रमांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन शाळेतर्फे करण्यात आले आहे.

संपादकीय

# ट्युलिप्सचे दिवस

प्रशांत बाफना 8055440385

"ट्युलिप " हे एक फूल आहे.ते फूल मूळचे मध्य आशिया कझाकीस्तान,तुर्कीये या भागातल्या थंड हवेच्या डोंगराळ प्रदेशातील जरी असले तरी हे चित्ताकर्षक ट्युलिप फूल,डच लोकांनी जगभरात पोहोचवले असे लेखात नमूद करून तद्अनुषंगाने तपशीलात भाष्य करणाऱ्या या अभ्यासपूर्ण व ज्ञानवर्धक लेखाचा सुसूत्र,सविस्तर गोषवारा असा:—

नेदरलँड्स हा देश वसंत ऋतूत फुलांनी आणि फुलशेतीने भरून जातो.गमतीशीर गोष्ट म्हणजे नेदरलँड्स मध्ये एकही डोंगर नाही.इथले हवामान कमालीचे स्वच्छंदी आहे.कधी कधी एकाच दिवसात येथे सगळे ऋतू अनुभवास मिळतात.

तरीही डचांनी सोळाव्या शतकात ऑटोमन साम्राज्यासोबत आणलेल्या 'ट्युलिप' या फुलांची लागवड येथे केली जाते.समुद्रसपाटीपासून खाली(नेदर) असलेल्या भागात (लँड्स)समुद्राला भराव घालून,येथील शेतकऱ्यांनी शेतजमीन तयार केली आहे.दलदलीच्या प्रदेशातील माती उकरून त्यात पिकांची लागवड करत इथल्या शेतकऱ्यांनी जगभरातला फुलांचा व्यापार काबीज केला आहे. केनिया व इतर आफ्रिकन देशातून आणखी वेगळी फुले आयात करून नेदरलँडला फुलाचे जागतिक हब बनवले आहे.संपूर्ण जगाला वसंत ऋतूत इथून फुले पुरविली जातात.ज्यात प्रामुख्याने ट्युलिप,डच हायसिंथ,लिली अशी अनेक प्रकारची फुले असतात.

ट्युलिपची शेती एक रंजक विषय आहे.

एक बी किमान तीन वेळा फुलं देते.फुलं तोडल्यानंतर शेतकरी एप्रिल ते ऑक्टोबर हा उन्हाळ्याचा काळ शेती तशीच सोडून देतात.सर्व पोषणतत्त्वे पुन्हा मुळांशी जाऊन बी ( ज्याला कांदा किंवा बल्ब म्हणतात)ते पुन्हा बळकट होऊन पुनर्लागवड करण्यास तयार होते.ऑक्टोबर मधे हे बल्ब गोळा करून साठवणूक केली जाते.ट्युलिप दोन्ही हंगामात दोन प्रकारे लावले जातात. हिवाळ्यात ग्रीन हाऊसमध्ये लावलेले रोप जानेवारी महिन्यात विक्रीसाठी उपलब्ध होते तर निसर्गावर अवलंबून केलेली लागवड वसंत ऋतूत बहरात येते.या दिवसात ॲमस्टरडॅम विमानतळापासून दक्षिणेला दक्षिण हॉलंडच्या सीमेपर्यंत संपूर्ण फुलशेतीत सायकलवरून फेरफटका मारताना ट्युलिपचे मनमोहक दृश्य दिसतं.फुलांचा मंद सुगंध मंत्रमुग्ध करून टाकतो.या दिवसांत जगभरातून पर्यटक ट्यूलिप बघायला येतात.डच लोक मुळातच व्यापारी वृत्तीचे असल्यामुळे आपल्या फुलबागा पर्यटकांना खुल्या करून भरपूर नफा कमावतात.फुलांची एप्रिलच्या आखेरीस छाटणी करून परदेशी विक्रीला पाठवतात.

ट्युलिपच्या बागांमध्ये फिरत असताना 'क्यूकेनहोफ गार्डन ' ( किचन गार्डन ) येते.१५ व्या शतकात ही जागा भाज्या आणि औषधी वनस्पती पिकवण्यासाठी वापरली जात असे.म्हणूनच याला किचन( क्युकेन) गार्डन(हॉफ) नाव पडले.१९५० मध्ये ही बाग ट्युलिप व इतर फुलबागांसाठी सार्वजनिक करण्यात आली.आज ही जगातील सर्वात मोठी फुलांची बाग आहे.दरवर्षी या ३२ हेक्टर जमिनीवर सुमारे ७० लाख फुलांचे बल्ब हाताने लावले जातात.ट्युलिपच्या ८०० पेक्षा जास्त जाती इथे दिसतात.सोबतच हायसिंथ्य,डॅफोडिल्स,ऑर्किड्स आणि गुलाबही असतात.या बागेत फिरताना फुलांचे रंग मनावर उतरतात. येथेच अमिताभ आणि रेखा यांच्या 'सिलसिले 'चित्रपटातील ' देखा एक ख्वाब' गाण्याचे चित्रीकरण करण्यात आले होते.९० च्या दशकात सलमान आणि राणी मुखर्जी यांचं 'तेरी चुनरिया दिल ले गई 'गाणंही याच ठिकाणी चित्रित झालंय.त्यामुळे भारतीय पर्यटक इथं मोठ्या संख्येनं दिसतात.

ट्युलिप शेतीविषयी अनेक रंजन कथा आहेत.१६३० च्या सुमारास हॉलंडमध्ये 'ट्युलिप मोनिया ' नावाचा काळ आला होता.तेव्हा एका दुर्मिळ ट्युलिपच्या बल्बची किंमत ॲमस्टरडॅममधील एका अलिशान घराइतकी होती.हे जगातील पहिले आर्थिक संकट मानले जाते.पूर्वी तुर्की राजवटीत सुलेमान(राजे) हे डोक्यावर पगडी ( टर्बन) घालायचे त्याचा आकार या फुलांसारखा असायचा.टर्किश लोक या फुलांला ' लाले ' म्हणत.हे फूल कझाकस्तानवरून तुर्कीमार्गे युरोपात आले.सुलेमानची पगडी आणि या फुलांचा संदर्भ घेऊन या फुलाला 'ट्युलिप ' म्हटले जाऊ लागले.ट्युलिप हा शब्द मूळचा पर्शियन शब्द 'देलबंद ' वरून तुर्की शब्द 'तुलबंद' आणि लॅटिनमध्ये ' तुलिपा ' आणि नंतर इंग्रजी,फ्रेंच भाषेत ' ट्युलिप' असा प्रवास करत जगभर पोहोचला.

दुसऱ्या महायुद्धाला अनुसरून इथले स्थानिक लोक दोन कथा नेहमी सांगतात.पहिली म्हणजे युद्ध काळात जर्मन सैनिकांनी नेदरलँडला जाणारी अन्नाची रसद थांबवली.उपासमार होऊ लागली तेव्हा डच सरकारने ट्युलिप बल्ब अन्न म्हणून वापरण्याचे आवाहन केले.स्थानिक शेतकऱ्यांनी बियाणे म्हणून साठवलेले बल्ब लोकांसाठी उपलब्ध केले.चवीला अत्यंत कडू आणि कोरडे ट्युलिप खाऊन हजारो लोकांनी जीव वाचवले.दुसरी घटना म्हणजे युद्धाच्या काळात डच राजघराण्याने कॅनडातील ओटावा शहरात आश्रय घेतला होता.तसेच नेदरलँडच्या मुक्ततेत कॅनडियन सैन्याने मोठी भूमिका बजावली होती.याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी डच राजघराण्याने १९४५ मध्ये कॅनडाला एक लाख ट्युलिप बल्ब भेट दिले.आजही दरवर्षी नेदरलँड कॅनडाला २० हजार ट्युलिप बल्ब भेट म्हणून पाठवते.याच परंपरेतून ओटावामध्ये जगातील सर्वांत मोठा 'कॅनडियन ट्युलिप फेस्टिव्हल ' साजरा केला जातो

# 771 ग्रामपंचायतींच्या आरक्षणाकडे नजरा; अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाला सादर

अहिल्यानगर | प्रशांत बाफना

जिल्ह्यातील जानेवारी ते डिसेंबर 2026 या कालावधीत मुदत संपणाऱ्या 771 ग्रामपंचायतींची प्रभाग रचना कार्यक्रम फेब्रुवारी महिन्यांत जाहीर करण्यात आला होता. या प्रभाग रचनेवर 13 एप्रिलपर्यंत हरकती घेण्यात येवून त्यावर सुनावणी घेवून या ग्रामपंचायतींची अंतिम प्रभाग रचना सोमवार (दि.4 मे) रोजी जाहीर करण्यात आली आहे. आता या ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी इच्छुकांच्या आरक्षणाकडे नजरा लागला आहेत. दरम्यान, राज्य निवडणूक आयोग लवकरच या ठिकाणचे आरक्षण जाहीर करणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

जिल्ह्यातील जानेवारी ते डिसेंबर 2026 या कालावधीत 771 ग्रामपंचायतींची मुदत संपणार आहे. यामुळे या ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी आवश्यक असणारी प्रभाग रचनेची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. यात 771 ग्रामपंचायतीपैकी 618 ग्रामपंचायतींवर एकही हरकत दाखल नव्हती. तर 153 ग्रामपंचायतींवर 384 हरकती दाखल झाल्या होत्या. यावर एप्रिल महिन्यांत अंतिम सुनावणी घेवून सोमवार (दि.4) रोजी त्या ठिकाणची प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे.

दरम्यान, मुदत संपणाऱ्या या ग्रामपंचायतींचा प्रभाग रचनेचा कार्यक्रम आता अंतिम झाल्याने आता निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी या ठिकाणचे आरक्षण राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात येणार आहे. 2011 च्या लोकसंख्येवर आधारीत असणारे हे आरक्षण राहणार आहे. जिल्हा प्रशासनाने काल सोमवारी प्रभाग रचना अंतिम करून त्याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगाला सादर केलेली आहे. लवकरच राज्य निवडणूक आयोग मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करणार आहे.

या ग्रामपंचायतींची प्रभाग रचना जाहीर अकोले 52, संगमनेर 94, कोपरगाव 29, राहाता 25, नगर 59, श्रीरामपूर 27, राहुरी 44, नेवासा 59, पाथर्डी 79, शेवगाव 48, कर्जत 56, जामखेड 49, पारनेर 88 आणि श्रीगोंदा 62 यांचा समावेश आहे.

## आता निवडणुका दिवाळीनंतरच ?

नगर जिल्ह्यातील 771 ग्रामपंचायतींची चालू वर्षी मुदत संपणार आहे. या ग्रामपंचायतींचा प्रभाग रचना अंतिम करण्यात आलेला आहे. लवकरच आरक्षण कार्यक्रम जाहीर होणार आहे. हा आरक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी 15 दिवसांपासून अधिकचा कालावधी लागणार आहे. शिवाय पुढील 125 दिवसांत पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यात निवडणूका घेत येत नसल्याने आता मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसफाठी पावसाळ्यानंतर निवडणूका होण्याची शक्यता व्यक्त होत आहे

# शिक्षक-विद्यार्थी हितासाठी गतिमान प्रशासनाचा संकल्प
## उपशिक्षणाधिकारी शिंदे यांचा अमरसिंह पंडित यांचेकडून सन्मान

बीड दि. 5 (प्रतिनिधी): धनंजय रामराव शिंदे यांनी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) म्हणून दि. 4 मे रोजी कार्यभार स्वीकारला. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयात तब्बल 14 वर्षे कार्य करताना मिळालेल्या अनुभवाच्या बळावर ते प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. उपशिक्षणाधिकारी या पदाची नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी म्हटले की, शिक्षणाधिकारी (मा.) सौ. प्रियाराणी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामकाज पारदर्शक, गतिमान व परिणामकारक पद्धतीने राबविण्यात येईल. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी विशेष लक्ष देण्यात येईल. अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक व मुख्याध्यापकांचे विविध प्रश्न प्राधान्याने सोडवून आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ राबविण्यात येतील, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. तसेच, सेवानिवृत्त शिक्षकांची वैद्यकीय बिले वेळेत मंजूर करून त्यांचा जलद निपटारा करण्यात येईल. कार्यालयीन कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी "झिरो पेंडन्सी" धोरण राबवून सर्व प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी उपशिक्षणाधियंती शिंदे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. धनंजय शिंदे यांच्या नियुक्तीमुळे शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्याच्या दिशेने हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# खासदारांच्या विरोधात व्हिडिओ पोस्ट केल्याचा राग; तरुणाचे अपहरण करून अमानुष मारहाण

अहिल्यानगर /प्रशांत बाफना

सोशल मीडियावर खासदार निलेश लंके यांच्या विरोधात व्हिडिओ पोस्ट केल्याच्या रागातून एका तरुणाचे पुण्यातील खराडी भागातून अपहरण करून त्याला अहिल्यानगर जिल्ह्यात अमानुषपणे मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील आष्टी येथील रहिवासी किशोर महादेव परभणे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादीने खासदार निलेश लंके यांच्याबाबत सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट केला होता. याचाच राग मनात धरून आरोपी प्रणय विजय मोरे, शरद खंडू पवार, मारुती देवराम कोकाटे (दोघे रा. चिचोंडी पाटील), रॉबीन सिंग आणि एका अनोळखी व्यक्तीने फिर्यादीचे पांढऱ्या रंगाच्या स्वीफ्ट कारमधून अपहरण केले.

आरोपींनी किशोर यांना चिचोंडी पाटील येथील हरिओम हॉटेलच्या पाठीमागे असलेल्या एका खोलीत डांबून ठेवले. तिथे त्यांचे कपडे काढून, हात-पाय बांधून लाथाबुक्क्यांनी गंभीर मारहाण करण्यात आली. आरोपींनी पीडित तरुणाला जबरदस्तीने संडास साफ करायला लावून अमानुषपणे लघवी पाजल्याचा खळबळजनक आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच या अमानवीय कृत्याचा व्हिडिओ बनवून त्यांना धमकावण्यात आले. या घटनेनंतर आरोपींनी फिर्यादीला बीड जिल्ह्यातील अंभोरा पोलीस ठाण्यात नेऊन त्यांच्या मर्जीविरोधात काही कागदपत्रांवर लिहून घेतले. या घटनेने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून नगर तालुका पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

**भिंगारमध्ये तलवार बाळगणाऱ्या तरुणाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या**

भिंगार / प्रशांत बाफना

अहिल्यानगर शहरात विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कडक मोहीम हाती घेतली आहे. सोलापूर रस्त्यावरील भुईकोट किल्ल्याजवळ लोखंडी तलवार घेऊन फिरणाऱ्या एका तरुणाला भिंगार कॅम्प पोलिसांनी सापळा रचून रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ४ मे २०२६ रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांना गुप्त बातमीदारामार्फत एक तरुण तलवार घेऊन येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ तपास पथकाला सोलापूर रस्त्याकडे रवाना केले. पोलिसांनी सापळा लावला असतानाच उदय अब्राहम ढगे (वय २२, रा. शांतीनगर, केदारवस्ती) हा तरुण हातात धारदार तलवार घेऊन येताना दिसला. पोलिसांची चाहूल लागताच त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पथकाने त्यास जागीच पकडले.

तपास पथकाने पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्याकडे लोखंडी तलवार मिळून आली. शस्त्राबाबत विचारपूस केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. याप्रकरणी पोलिसांनी उदय ढगे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

**जुन्या वादातून तरुणाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण; सहा जणांवर गुन्हा दाखल**

अहिल्यानगर: शहरातील टिळक रोड परिसरात जुन्या भांडणाच्या रागातून एका तरुणाला दुचाकीवर नेऊन सहा जणांच्या टोळक्याने लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वाकोडी येथील रहिवासी आयुष गुलाब पवार हा तरुण आपल्या खासगी कामात व्यस्त असताना आरोपींनी त्याला गाठले. पूर्ववैमनस्यातून युवराज भिंगारदिवे, अभिषेक शेलार आणि त्यांच्यासोबत असलेल्या इतर चार अनोळखी साथीदारांनी आयुषला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून लकडी पुलाच्या परिसरात नेले. तिथे बेकायदेशीर जमाव जमवून आरोपींनी फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

रागाच्या भरात आरोपींनी लाकडी दांडक्याने आयुषला मारहाण केली, ज्यामध्ये तो जखमी झाला आहे. "आमच्या नादी लागला तर जिवे मारून टाकीन," अशी धमकी देत आरोपींनी परिसरात दहशत निर्माण केली. या घटनेनंतर घाबरलेल्या पीडित तरुणाने कोतवाली पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेत आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.

पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप पितळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. भरदिवसा घडलेल्या या प्रकारामुळे शहरात सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे.

**जुन्या वादातून दुकानदारावर जीवघेणा हल्ला; १८ हजारांची रोकड गहाळ**

अहिल्यानगर: भिंगार येथील मिरवली पहाड परिसरात एका दुकानदारावर धारदार शस्त्राने आणि लोखंडी रॉडने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी खालीद अब्दुल गफुर शेख (वय ४३, रा. आलमगीर) हे १ मे रोजी सायंकाळी आपल्या दुकानावर असताना ही घटना घडली. संशयित आरोपी शेख शेम्स उर्फ सोनु याने फिर्यादीला पाठीमागून घट्ट धरून ठेवले. त्यानंतर शेख अली बागवान याने हातातील धारदार शस्त्राने फिर्यादीच्या डोक्यावर डाव्या बाजूला वार करून गंभीर जखमी केले. याचवेळी शेख मोईन बागवान याने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या कंबरेवर प्रहार केला. हल्लेखोरांनी 'पुन्हा आमच्या नादी लागला तर जिवे मारू' अशी धमकी देऊन घटनास्थळावरून पळ काढला. या झटापटीत फिर्यादीची १८ हजार रुपयांची रोकड गहाळ झाली असून मोबाईलचेही नुकसान झाले आहे. जखमीवर श्रीदीप हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. पोलिसांनी याप्रकरणी शेख मोईन, शेख अली आणि शेख शेम्स यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मोरे हे करीत आहेत.

**अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू; तोफखाना पोलिसांत गुन्हा दाखल**

अहिल्यानगर: शहरातील कोठला परिसरात राजचेंबर समोर भरधाव वेगाने जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एकनाथ काशीनाथ चव्हाण यांचा मृत्यू झाला असून, धडक देऊन चालक वाहनसह पसार झाला आहे.

याप्रकरणी राजू काशीनाथ चव्हाण यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, २९ एप्रिल रोजी सायंकाळी सव्वा पाच वाजेच्या सुमारास त्यांचे भाऊ एकनाथ चव्हाण हे आपल्या दुचाकीवरून (क्रमांक एमएच १७ बीटी ३४२०) रस्ते मार्गावरून जात होते. यावेळी एका अज्ञात वाहन चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत आपले वाहन अविचाराने व भरधाव वेगाने चालवून एकनाथ यांच्या दुचाकीला पाठीमागून भीषण धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्यामुळे एकनाथ चव्हाण यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर अज्ञात चालक मदतीसाठी न थांबता घटनास्थळावरून पळून गेला. या घटनेचा तपास सहायक पोलीस निरीक्षक पूनम श्रीवास्तव करत आहेत. पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला असून, परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या आधारे फरार वाहनाचा शोध घेतला जात आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक अधिक तपास करत आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात एकाच दिवशी रोखले 10 बालविवाह ; वधू-वरांच्या पालकांना गुन्हा दाखल करण्याची नोटीस

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना

महिला व बालविकास विभागाच्या सतर्कतेमुळे जिल्ह्यात एका दिवसात 11 बालविवाह थांबविण्यात प्रशासनाला यश मिळाले आहे. या कारवाईमुळे बालविवाह प्रतिबंधाबाबत प्रशासनाची सजगता अधोरेखित झाली आहे.

दरम्यान, रोखण्यात आलेल्या बालविवाह प्रकरणी संबंधित अल्पवयीन वधू आणि वरांच्या पालकांना जिल्हा महिला बालकल्याण विभागाच्यावतीने नोटीस बजावून गुन्हा दाखल करण्याची नोटीस बजावण्यात आलेली आहे.

रविवार 3 मे 2026 रोजी जिल्ह्यात मोठी लग्नतिथी होती. या दिवशी जिल्ह्यात तब्बल एकाच दिवशी 11 बालविवाह होत असल्याची गुप्त माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे बालविवाह रोखण्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईत नगर शहरात 3, अकोलेत 1, राहुरी 1, श्रीगोंदा 1, पाथर्डी 1, नेवासा



1 आणि नगर तालुक्यात 1, श्रीरामपूर 1 असे 10 बालविवाह थांबविण्यात आले. या मोहिमेत पोलीस यंत्रणा, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, अंगणवाडी सेविका, मुख्यसेविका, जिल्हा बालसंरक्षण कक्ष तसेच चाइल्ड हेल्पलाइन कक्ष यांचा सक्रिय सहभाग राहिला. सर्व यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय साधून ही कारवाई करण्यात आली. नागरिकांनीही अशा घटनांची माहिती तत्काळ प्रशासनाला द्यावी व सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, बालविवाह रोखण्यात आलेल्या वधू आणि वरांच्या पालकांना जिल्हा बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले असून यापुढे त्यांनी बालविवाह केल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची नोटीस बजावण्यात आलेली आहे. रविवारी जिल्ह्यात मोठी लग्नतिथी होती. या दिवशी 11 ठिकाणी बालविवाह लावण्याचा घाट घालण्यात आला होता. मात्र, तो महिला बालकल्याण विभागाने उधळून लावला.

**बालविवाह लावणाऱ्या वधू-वरांच्या पालकांसह लग्न लावून देणारे भटजी, मंगल कार्यालयाचे मालक, केटर्स, लग्नाला हजर राहणाऱ्या व्यक्तींवर बालविवाह प्रतिबंध कायदा 2006 नूसार गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्यात कोणीही बालविवासह लावू नयेत.**
**– संजय कदम, महिला व बालविकास अधिकारी**

# सोयगाव तालुक्यात मिरची लागवडीचा वाढता कल;
## बाजारभावावर शेतकऱ्यांचे लक्ष



.....सोयगाव ता...
प्रतिनिधी सुनील चोरमले..
.....

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा, टिटवी, देव्हारी, डाभा आणि पळासखेड शिवारात यंदा मिरची पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येत आहे. मागील वर्षी मिरचीला चांगला बाजारभाव मिळाल्यामुळे यंदा अनेक शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांऐवजी मिरचीकडे वळण्याचा निर्णय घेतला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील भोकरदन आणि सिल्लोड तालुक्यात आधीपासूनच मिरची लागवड मोठ्या प्रमाणात होत असून, तेथील सुमारे 80 टक्के शेतकरी नियोजनबद्ध पद्धतीने या पिकाची लागवड करतात. त्याच धर्तीवर आता सोयगाव तालुक्यातही मिरची शेतीचा विस्तार होताना दिसत आहे. सावळदबारा परिसरात सामान्यतः सोयाबीन, मका, कापूस आणि तूर ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. मात्र, या पिकांना अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आता मिरची, टोमॅटो, वांगी तसेच पालेभाज्यांकडे वळताना दिसत आहेत.

यंदा भाजीपाला पिकांच्या वाढत्या लागवडीमुळे आगामी काळात मिरची व पालेभाज्यांचे बाजारभाव स्थिर राहतील की घसरण होईल, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे. बदलत्या बाजारस्थितीनुसार शेतकरी आपले पीक नियोजन करत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

# मराठी माणूस हतबल ....

प्रशांत बाफना 8055440385
एक मे रोजी महाराष्ट्राच्या स्थापनेचा ६७ वा वर्धापन दिन मुंबई आणि महाराष्ट्रात सर्वत्र साजरा झाला. लोकभवनात तर महाराष्ट्र दिनाबरोबर गुजरात दिनही साजरा झाला. मुंबई महाराष्ट्राला कदापि मिळता कामा नये म्हणून ज्या गुजरातने प्रयत्न केले त्या राज्याचाही महाराष्ट्राने आपल्या जन्मदिनाला सरकारी पातळीवर सन्मान केला. महाराष्ट्र मनाने किती उदार आहे, त्याचेच हे उदाहरण आहे. महाराष्ट्रावर रोजगाराच्या शोधात वर्षानुवर्षे परप्रांतियांचे लोंढे आदळत आहेत, त्याबाबत मराठी माणूस शांत आहे. मराठी माणूस सर्वांना सामावून घेतो आहे. पण त्याच परप्रांतीयांना विशेषत: रिक्षा – ट’क्सी चालकांना मराठीतून बोला म्हटले की तेच, आम्ही मराठी बोलणार नाही अशी धमकी देतात. त्यांनी मराठी शिकावे म्हणून सरकार त्यांना वर्षभर मुदतवाढ देते, त्यांना मराठी पुस्तके देऊ म्हणून समाजसेवी संस्था पुढे येतात आणि त्यांच्या सोयीसाठी मराठी लोकच त्यांच्याशी आपणहून हिंदीतून बोलतात. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईची राजभाषा कोणती मराठी की हिंदी असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे. कोकणात किंवा मराठवाड्यातही मराठी लोक दुसऱ्याशी सर्रास हिंदी बोलू लागले आहेत. महायुती सरकारला राज्यात तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करायची गरजच नाही असे सर्वत्र वातावरण आहे.

मुंबई ही राज्याची राजधानी व देशाची आर्थिक राजधानी आहे. गेल्या दहा वर्षात महामुंबईतून अनेक मोठे उद्योग, व्यापार , आर्थिक व व्यावसायीक केंद्रे गुजरातला हलवली गेली. पण मुंबईचे आर्थिक महत्व कमी झालेले नाही. महामुंबईची लोकसंख्या दोन कोटींच्या जवळपास असावी. जगातील सर्वोच्च दहा व्यावसायीक केंद्रात मुंबई आहे. मोठ्या उद्योग समुहांची कार्यालये, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बँका व वित्तिय, विमा संस्थांची कार्यालये मुंबईत आहेत. भाभा अणुसंशोधन केंद्र, ओएनजीसी, बॉम्बे हाय, बॉलिवुड, पोर्ट ट्रस्ट ही मुंबईची शान आहे. देशाच्या खजिन्यात ४० टक्के आयकर, ६० टक्के कस्टम ड्युटी, सर्वाधिक जीएसटी, अबकारी कर, मुंबईतून जमा होते. देशाची ४० टक्के निर्यात मुंबईतून होते. मुंबई महाराष्ट्राला राजधानी म्हणून सहजासहजी मिळालेली नाही. १०६ हुतात्म्यांनी रक्त सांडून मुंबई मिळवली आहे. देशातील कोणत्या राज्याला राजधानीसाठी रक्त सांडावे लागलेले नाही. आपल्या शहराचे नाव बॉम्बे नसून मुंबई आहे यासाठीही मराठी माणसाला केंद्राशी लढा द्यावा लागला आहे. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरू, मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण, स. का पाटील अशा बलाढ्य काँग्रेस नेतृत्वाशी लढा देऊन संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबई महाराष्ट्रासाठी खेचून आणली आहे. भाषिक प्रांतवार रचनेनुसार मुंबई महाराष्ट्राला मिळाली आहे. पण याच मुंबईत आपण जेव्हा विमानाने किंवा रेल्वेने बाहेरून येतो तेव्हा रिक्षा – ट’क्सी चालक विचारतो, कहाँ जाना है भाई .... कुठे जायचे, कोण पाहिजे, असे कोणी मराठीतून विचारतच नाही. रिक्षा- ट’क्सीवाल्यांना मराठीशी काही देणे घेणे नाही. शालेय अभ्याक्रमात फ्रेंच राज्य क्रांती शिकवली जाते पण संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा लढा सविस्तर शिकवला जात नाही....

एक मे पासून महाराष्ट्रात रिक्षा – ट’क्सी व्यावसायीकांसाठी मराठीची सक्ति जाहीर केली. पण त्या विरोधात अमराठी सारे एकवटले. संपाची धमकी दिली. आम्ही युपी- बिहारला निघून गेलो तर मुंबई चालू राहील का ? असा प्रश्न विचारू लागले. त्यांच्या मागणीसाठी भाजपा व विसेनेतील काही महाभाग पुढे आले. रिक्षा- ट’क्सी परमिट हवे तर मराठी यायला हवे असा नियम आहे, मग मराठी येत नसताना परमिट दिले कसे ? ज्यांनी दिले त्यांच्यावर कारवाई करा आणि ज्यांना दिले त्यांचे रद्द करा, पण तसे करण्याची कोणाची हिम्मत नाही. मराठीच्या सक्तिच्या मुद्द्यावर सत्ताधारी मौन पाळून आहेत, विरोधी पक्ष कोणी आंदोलन करीत नाही. रस्त्यावर आंदोलने केली की पोलीस गुन्हे दाखल करतात आणि दुसरे महत्वाचे म्हणजे विरोधी पक्षातील नेत्यांना सत्ताधारी पक्षाला दुखावायचे नाही. कोणालाच विरोधी पक्षात राहायचे नसल्याने जनतेच्या प्रश्नांवर आता आंदोलनेच होत नाहीत. मंत्रालय, महापालिका, वॉर्ड ऑफिस, पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय, रेशनिंग, आरटीओ सर्वत्र मराठी कर्मचारी आहेत. पण तिथे अमराठी लोकांची पटापटा कामे होतात, कारण कामे करून देणारे दलाल हे मराठी जास्त आहेत. महाराष्ट्र दिन, मराठी भाषा गौरव दिन , अभिजात मराठी दिन असे तीन मराठी उत्सव राज्यात साजरे होतात. विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठीला अभिजात दर्जा मिळाला, तीन वर्षात केंद्राने एक रूपया सुध्दा मराठी भाषेच्या उन्नतीसाठी दिलेला नाही. मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्रात मराठी शाळा धडाधडा बंद पडत आहेत. त्याचे सरकारला काहीच वाटत नाही. मोक्याच्या जागी असलेल्या शाळांच्या भूखंडांवर कोणाचे लक्ष आहे? मुंबईतील शाळा, मैदाने, बगिचे यांच्या जागा टॉवर्स उभारण्यासाठी कोणाला देण्यात आल्या, त्यावर कधी विधिमंडळात चर्चा होत नाही. तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ति करण्यासाठी डबल इंजिन सरकार आग्रही आहे. चौफेर विरोध होताच सरकारने समिती नेमली. मग मराठी शाळा बंद पडू नयेत यासाठी समिती का नेमली जात नाही? संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात १०६ हुतात्म्यांनी रक्त सांडले, मुंबईतील कोणत्या रस्त्यांना त्यांची नावे ६६ वर्षात दिली आहेत ते एकदा जाहीर करावे. तसेच मुंबईतील रस्त्यांना याच काळात महाराष्ट्राशी संबंध नसलेली किती नावे दिली गेली त्याची यादी प्रसिध्द करावी. रस्त्यांना अमराठी नावे देण्यासाठी ज्या तत्कालीन नगरसेवकांनी शिफारसी केल्या त्यांचीही नावे मुंबईकर जनतेला समजावीत.मुंबई उच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर व महापालिकेने धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतरही सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना दाणे टाकणे बंद करू शकलो नाही. रस्त्यावरील व रेल्वे स्टेशन परिसरातील फेरीवाले हटवता येत नाहीत. एका धर्माच्या मंदिरांना जास्त ग’स सिलिंडर परवावेत अशी मागणी एक मंत्री करतो, त्याला कोणी रोखू शकत नाही. वसतीगृह, जिमखाना की विमानतळ ज्याला चालवायला देतो तोच मालकी हक्क म्हणून आपले किंवा आपल्या धर्माचे फलक तिथे लावून टाकतो, यावर कुणाचे नियंत्रण नाही.

विरोधी पक्ष सरकारला जाब विचारत नाही. विधिमंडळातही सरकारला धारेवर धरत नाही. कारण विरोधी पक्षात कोणाला राहायचे नाही. विरोधी पक्षात राहून स्वत:चा विकास होत नाही. म्हणूनच संधी मिळाली की विरोधी पक्ष फुटतात. ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन मोठे प्रादेशिक पक्ष दुभंगल्यापासून राज्यात विरोधी पक्ष खचला आहे. या पक्षातले आणखी कोणी सत्तेकडे गेले तरी आश्चर्य वाटू नये अशी परिस्थिती आहे. अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाचे सात खासदार भाजपात गेले हे त्याचे ताजे उदाहरण आहे. सध्या जनगणना व मतदार याद्या सुधारणा हा कार्यक्रम महाराष्ट्रात राबवला जातो आहे. मतदार याद्या सुधारणेनंतर मतदारसंघ पुर्नरचना होईल. नंतर मतदारसंघ वाढतील. नंतरच्या निवडणुकीत अमराठी आमदार, खासदार, नगरसेवक मोठया संख्येने निवडून येतील. महामुंबईत विकास प्रकल्पांवर हजारो कोटींची गुंतवणूक होत आहेच. भविष्यात महामुंबई केंद्र शासित करण्याचा प्रस्ताव आला तर संयुक्त महाराष्ट्रासाठी व मराठी माणासाच्या हितासाठी जीवाची बाजी लावून तेव्हा लढलेले वा. रा.कोठारी, प्रबोधनकार ठाकरे, कॉमरेड श्रीपाद अमृत डांगे, क्रांतिसिंह नाना पाटील, उध्दवराव पाटील, सी. डी. देशमुख, सेनापती बापट, ब’. नाथ पै, अण्णाभाऊ साठे, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, जॉर्ज फर्नांडिस, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, असे कोणीही मशाल पेटवायला नसतील. सध्याचा विरोधी पक्ष कमकुवत आहे. मराठी माणूस हतबल आहे. महाराष्ट्र दिनाला हीच भावना प्रकट झाली

# पाणीपुरवठा विस्कळित; नागरिक संतप्त, कारवाईची मागणी

## वॉलमनच्या उद्धट वागणुकीविरोधात तीव्र नाराजी, कारवाईची मागणी

अहिल्यानगर |प्रशांत बाफना
शहर व उपनगरांमध्ये गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक व नागरिकांच्या वतीने महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांना निवेदन देत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी नगरसेवक निखिल वारे, नगरसेवक महेश लोंढे, सामाजिक कार्यकर्ते अभिजीत बोरुडे, रोहन फडतरे आदीसह नागरिकांनी केली.



उन्हाळ्याचे दिवस सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची गरज वाढलेली असताना, वीज वितरणातील अडचणी, भारनियमन तसेच नियोजनाच्या अभावामुळे शहरात वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी नागरिकांना पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी इतर ठिकाणी भटकंती करावी लागत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. नागरिकांनी पाणीपुरवठ्याबाबत माहिती घेण्यासाठी संबंधित वॉलमनशी संपर्क साधला असता, त्यांच्याकडून उडवाउडवीची व उध्दट उत्तरे दिली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.

तसेच पाणीपुरवठ्याची नोंद ठेवण्यासाठी आवश्यक असलेली डायरी व्यवस्थित न भरणे, नागरिकांच्या स्वाक्षऱ्या न घेणे अशा प्रकारच्या बेजबाबदार वर्तणुकीमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे.या संपूर्ण प्रकारामुळे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याचा फटका प्रभागातील लोकप्रतिनिधींनाही बसत असून त्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.या पार्श्वभूमीवर शहरातील विस्कळीत झालेला पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, वॉलमनच्या बेजबाबदार वर्तणुकीवर कठोर कारवाई करावी तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख, प्रभाग अधिकारी, हेड वॉलमन व संबंधित कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक आयोजित करून ठोस निर्णय घ्यावेत, अशी ठाम मागणी नगरसेवकांनी केली आहे.

# नगर जिल्ह्यातील या धरणाचा पाणी साठा आला निम्म्याच्या खाली

अहिल्यानगर प्रशांत बाफना
नगर जिल्ह्यातील सर्वाधिक क्षमता असणाऱ्या मुळा धरणाचा साठा मे महिन्यात 50% पेक्षा कमी झाला आहे . सध्या धरणाच्या उजव्या कालव्याचे शेतीचे उन्हाळी आवर्तन सुरू आहे . पुढील महिनाभर हे आवर्तन चालेल . यंदाच्या वर्षी पावसाने चांगली कामगिरी केल्यामुळे नगर जिल्ह्यातील सर्वच धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठे होते . त्यानंतर जानेवारी महिन्यात काही ठिकाणी शेतीसाठी



आवर्तन द्यावे लागले . साधारणतः धरणातील पाणीसाठे एप्रिल महिन्यातच निम्म्याच्या खाली येतात . मात्र यंदाच्या वर्षी समाधानकारक पाणीसाठा राहिल्याने आज पाच मे 2026 ला मुळा धरणाचा पाणीसाठा 50% पेक्षा कमी झाला असून पुढील पावसाळ्यापर्यंत पाणीसाठ्याची चांगली परिस्थिती असू शकते , असा अंदाज आहे . सध्या मुळा धरणातून उजव्या कालव्याद्वारे राहुरी नेवासा पाथर्डी शेवगाव या तालुक्यातील शेती सिंचनाचे आवर्तन सुरू असून हे आवर्तन महिनाभर चालेल . यात चार टीएमसी पाणी खर्च होण्याची शक्यता आहे . आज अखेर मुळा धरणात 12 हजार 837 दशलक्ष घनफूट ( 49.37% ) पाणीसाठा असून आठ हजार 337 दशलक्ष घनफूट ( 38 टक्के ) उपयुक्त पाणीसाठा असून धरणाच्या उजवा कालव्याद्वारे 1 हजार 500 क्यूसेकने शेतीचे आवर्तन सुरू आहे . मुळा धरणाच्या अधिकाऱ्यांना अधिक चौकशीसाठी संपर्क केला असता कोणाचाही संपर्क होऊ शकला नाही

# अहिल्यानगर जिल्ह्यात 651 सहकारी संस्था बंद; 229 ची नोंदणी रद्द

अहिल्यानगर/प्रशांत बाफना

सहकारी संस्थांचा कणा समजल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातच काही दिवसांपासून सहकाराला ओहोटी लागल्याचे चित्र आहे. लेखापरीक्षण नाही, व्यवहार नाहीत, संस्थेचा पत्ताही सापडत नाहीत, अशा वेगवेगळ्या कारणांनी आतापर्यंत तब्बल 651 सहकारी संस्था अवसायानात काढण्यात आल्या असून, गत वर्षभरातच 165 संस्थांवर अशी कारवाई झाली आहे.

दरम्यान, यातील 229 संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.गेल्या काही दिवसांपासून ‘त्या’ पतसंस्थांमधील घोटाळ्यांमुळे सहकार विभागाच्या कार्यपद्धतीवर आणि देखरेखीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अनेक संस्था कागदावर दिसतात, मात्र त्या शोधूनही सापडत नाहीत. सहकार विभागाच्या नोंदीनुसार, गेल्या काही वर्षांत सहकार कायद्याचा भंग करणाऱ्या काही संस्था निष्क्रिय झाल्या आहेत. त्यांच्यावर टप्प्याटप्प्याने कारवाई सुरू करण्यात आलेली आहे.2024-2025 पर्यंत अशा 486 संस्थांवर अशी कारवाई केली आहे. तर 2025-26 या वर्षभरात आणखी 165 संस्था अवसायानात काढण्यात आल्या आहेत. त्यामुळे आतापर्यंत 651 संस्थांना टाळे लागले आहेत. या संस्थांना अवसायनात आणण्यामागे विविध कारणे पुढे येत आहेत. त्यात ऑडिट रिपोर्ट सादर न करणे, वेळेवर नोटिशीला उत्तर न देणे, संस्था स्थापन केल्यापासून व्यवहार न करणे, आवश्यक माहिती देण्यास टाळाटाळ करणे, अशा अन्य काही गंभीर त्रुटींचा यात समावेश आहे.

संबंधित संस्थांवर जिल्हा उपनिबंधक यांच्या मार्गदर्शनात अवसायनात काढण्याची कारवाई केली जाते. त्यावर अवसायक नेमून पुढील कार्यवाही केली जात आहे. 651 पैकी 229 संस्थांना दोषी ठरवत त्यांची नोंदणी रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे. केवळ 10 संस्था पुन्हा सुरू झाल्या आहेत.

# रेपेवाडी येथे शॉर्टसर्किटमुळे भीषण आग;एका व्यक्तीसह जनावरेही दगावली.

किल्ले धारूर/प्रतिनिधी
धारूर तालुक्यातील रेपेवाडी येथे मंगळवारी सायंकाळी सुमारे आठ ते नऊ वाजण्याच्या दरम्यान भीषण आग लागून एक जणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या आगीत मोठ्या प्रमाणात जनावरांचेही नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अशोक रामभाऊ रेपे यांच्या कोठ्याला अचानक शॉर्टसर्किटमुळे आग लागली. आग वेगाने पसरल्यामुळे त्यांच्या वडिलांचे, रामभाऊ एकनाथ रेपे यांचा आगीत होरपळून मृत्यू झाला. ही घटना गावाच्या पश्चिमेकडील भागात घडली.
या आगीत सुमारे दहा गायी, पंधरा शेळ्या






तसेच अंदाजे दीडशे कोंबड्या जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.आग लागल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले.
घटनेची माहिती मिळताच तहसीलदार श्रीकांत निळे तसेच धारूर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. प्रशासनाकडून पंचनामा केला आहे, नुकसानिचा अंदाज घेतला जात आहे.
या दुर्दैवी घटनेमुळे रेपेवाडी गावावर शोककळा पसरली असून संबंधित कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्रशासनाकडून मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे

# पद्मश्री डॉ. मनीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार शिवराज साने सर (संगीतकार ) यांना प्रदान.महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय गौरव पुरस्कार सोहळा उत्साहात



ऊरूळी कांचन येथील डॉ मनीभाई देसाई प्रतिष्ठानच्या वतीने सोमवार 27 एप्रिल 2026 रोजी डॉ मनीभाई देसाई यांच्या 106 व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. विविध क्षेत्रातील मान्यवरांना हा पुरस्कार देण्यात आला. संगीत व कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल श्री शिवराज साने सर यांना ही पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. गेली 20 वर्षे ऊरूळी कांचन आणि परीसरात संगीत क्लासेस सुरू करून नाममात्र दरात संगीत शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम सादर केले साने संगीत क्लासेसच्या माध्यामातून आकाशवाणी रेडिओ केंद्रवर कार्यक्रम सादर केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना उत्कृष्ट संगीतकार पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांमध्ये ना. रविंद्र साठे (खादी ग्रामोद्योग मंत्री ) जयश्री पाटील (पी. एस. आय. राष्ट्रपती पदक विजेते) अदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे स्थळ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह टिंबर मार्केट पुणे येथे होते. व आयोजन ह.भ.प. डॉ रविंद्र भोळे ( हिंदू रत्न पुरस्कार विजेते) प्रमुख राष्ट्रसेवा समिती महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. सूत्रसंचालन प्रा साळवे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ नार्मन नार्टन सर यांनी केले.

# शेवगाव जळतंय भीषण आग, कोट्यवधींचे नुकसान... तरीही शेवगाव स्वत:चा अग्निशमन बंब नाही!

अहिल्यानगर ( प्रशांत बाफना ) - शहरातील नेवासा रोडवरील बॉम्बे मशिनरीच्या गोडाऊनला १ मे रोजी लागलेल्या भीषण आगीने पुन्हा एकदा शेवगावच्या सुरक्षाव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे स्पष्ट झाले. लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले, धुराचे प्रचंड लोळ शहरभर दिसत होते, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले... पण या सर्व संकटाच्या क्षणी शेवगाव नगरपरिषदेकडे स्वतःची अग्निशमन यंत्रणाच नसल्याने हजारो नागरिकांना फक्त हात बांधून आगीचा तांडव पाहावा लागला.

बॉम्बे मशिनरी गोडाऊनला आग लागल्यानंतर शेवगावमधील नागरिक, नगरपरिषद कर्मचारी आणि पोलीस प्रशासन यांनी धावपळ केली ; मात्र प्रत्यक्ष आग विझवण्यासाठी स्वतःचे साधन नसल्याने सर्वांना हतबलपणे बाहेरील अग्निशमन दलाची वाट पाहावी लागली. पाथर्डी नगरपरिषदेची गाडी, साखर कारखान्यांचे बंब आणि बाहेरील यंत्रणा आली म्हणून मोठी जीवितहानी टळली; पण प्रश्न कायम आहे —शेवगावला स्वतःचा अग्निशमन बंब कधी मिळणार?

ही केवळ एक दुर्घटना नाही, तर गेल्या अनेक वर्षांपासूनच्या प्रशासनाच्या निष्क्रियतेचा आणि लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेचा जळता पुरावा आहे. यापूर्वी वाचनालयासमोरील दुकाने, तुषार फूड्सजवळील आगीसारख्या घटनांमध्ये अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त




झाले, उसाच्या आगी, गॅस सिलिंडर दुर्घटना यामध्ये व्यापारी व सर्वसामान्यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले, पण प्रत्येक वेळी फक्त पंचनामा, सांत्वन आणि आश्वासने... प्रत्यक्ष कृती मात्र फक्त कागदावरच.

नगरपरिषद नागरिकांकडून अग्निशमन कर, वृक्षारोपण कर आणि विविध कर वसूल करते. पट्टी उशिरा भरली तर दंडही आकारते. मात्र नागरिकांचा सवाल सरळ आहे —कर आम्ही भरतो, पण संकटात संरक्षण कुठे आहे?”

तालुका कपाशी चे आगार असल्याने शहरात मोठ्या प्रमाणावर कापूस जिनिंग व ऑईल मिल्सचे जाळे, व्यापारी गोडाऊन, हॉस्पिटल्स, बाजारपेठा आणि दाट लोकवस्ती असताना शेवगावसारख्या वाढत्या शहरात स्वतःचा अग्निशमन बंब नसणे ही केवळ प्रशासनाची चूक नसून नागरिकांच्या जीवाशी खेळ असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे.

गेल्या २५ वर्षांत विविध पक्षांचे अनेक नेते सत्तेत आले, आश्वासने दिली, दुर्घटनास्थळी भेटी दिल्या, सांत्वन केले; मात्र शेवगावसाठी कायमस्वरूपी अग्निशमन केंद्र उभारण्याचा कोणालाही यश आले नाही. परिणामी प्रत्येक मोठ्या आगीत शेवगावला पाथर्डी नगरपरिषद, ज्ञानेश्वर, वृध्देश्वर,, गंगामाऊ साखर कारखान्याच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. आग लागल्यानंतरचे पहिले काही तास हे जीव आणि मालमत्तेसाठी अत्यंत महत्त्वाचे असतात, आणि नेमक्या त्याच वेळी शेवगाव असहाय्य ठरते.

“शेवगावकरांच्या जीवाची किंमत आहे की नाही?” हा प्रश्न आता प्रत्येक नागरिक प्रशासनाला आणि लोकप्रतिनिधींना विचारत आहे. जर आता तरी निर्णय झाला नाही, तर पुढील प्रत्येक आगीसोबत फक्त मालमत्ता नाही... तर लोकांचा विश्वासही राख होईल.

## आता तरी जागे व्हा!

शेवगावकरांचा संयम संपत चालला आहे. आज गोडाऊन जळाले... उद्या बाजारपेठ, हॉस्पिटल किंवा निवासी परिसर असेल तर जबाबदार कोण ?आता सांत्वन नको, तर शेवगावसाठी तातडीने स्वतंत्र अग्निशमन बंब, प्रशिक्षित कर्मचारी आणि सुसज्ज अग्निशमन केंद्र ही काळाची गरज बनली आहे

दैनिक लोकआरंभ
बुधवार ६ मे २०२६
www.lokaarambh.com



# अतिक्रमण धारकांना तात्काळ पीटीआर वाटप करून घरकुल योजनेचा लाभ द्या - आ.विजयसिंह पंडित

## अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत पीटीआर प्रश्नावर बैठक

बीड, दि.०५ (प्रतिनिधी) ÷ गेवराई शहरातील संजयनगर, इस्लामपूरा, साठेनगर, संतोष नगर, संघमित्रनगर, भिमनगर, कोरबू गल्ली, चिंतेश्वर गल्ली, अचानकनगर आदी भागांतील अतिक्रमण धारकांना विनाविलंब पीटीआर वाटप करून घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी दि.१५ मे पूर्वी अतिक्रमण धारकांना हक्काचे पीटीआर वाटप करा असे निर्देश आ. विजयसिंह पंडित यांनी दिले. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत आयोजित केलेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत त्यांनी पीटीआर वाटपास झालेल्या विलंबाबाबत तिव्र नाराजी व्यक्त केली. निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचे महायुती सरकारचे धोरण असताना प्रशासन याकामी विलंब का करत आहे ? असा सवालही आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थित केला. शासनाच्या नवीन धोरणानुसार पात्र होणाऱ्या अतिक्रमण धारकांनी पुराव्यासह नव्याने अर्ज करण्याचे आवाहन यानिमित्ताने आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. गेवराई नगर परिषद हद्दीतील अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण नियमाकुल करून त्यांना हक्काचा पीटीआर वाटप करण्याचा शुभारंभ राज्याचे तत्कालीन लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्याहस्ते गेवराई येथे करण्यात आला होता. नगर परिषद निवडणुकीपूर्वी अतिशय वेगाने सुरु असलेले हे काम निवडणुकीनंतर थांबल्यामुळे अतिक्रमण धारकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. या बाबत आ. विजयसिंह पंडित यांनी मंगळवार, दि.५ मे रोजी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीला माजी आमदार अमरसिंह पंडित, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, गेवराई नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, नायब तहसिलदार संजय सोनावणे, नगररचनाकार आकाश राठोड, भुमिअभिलेखचे उपअधिक्षक जाधव, नगर परिषदेचे अभियंता रामेश्वर कर्डिले, प्रदिप पुरी, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, नगर परिषदेतील राष्ट्रवादीचे गटनेते शेख खाजा, नगरसेवक दादासाहेब गिरी, झोपडपट्टी हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष कडूदास कांबळे, श्रीकृष्ण मुळे, सतिष



प्रधान, सदाफुले पाटील, जफर पटेल, प्रकाश गायकवाड यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. गेवराई नगर पालिका हद्दीतील संजयनगरसह इतर भागातील अतिक्रमण धारकांच्या हक्काच्या पीटीआरचा प्रश्न मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. विधानसभा निवडणुकीनंतर आ. विजयसिंह पंडित यांनी याप्रश्नी लक्ष घालून संबंधितांना हक्काचा पीटीआर देण्याची प्रक्रिया सुरु केली. त्यांच्या प्रयत्नामुळे २२२० भूखंड धारकांचे सर्व्हेक्षण पूर्ण करून त्यांना पात्र म्हणून समितीने घोषित केले. यापैकी अनेकांना भोगवटदार प्रमाणपत्रासह पीटीआरचे वाटप करण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकूलाचा लाभ संबंधितांना मिळावा यासाठी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. पंडित यांनी प्रयत्न केले. नगर परिषद निवडणुकीची आचार संहिता लागल्यामुळे याविषयीची पुढील कार्यवाही स्थगित झाली. निवडणुकीनंतर ही सर्व प्रक्रिया स्थगित झाली. अतिक्रमण धारक वारंवार या बाबत पाठपुरावा करत असल्यामुळे संबंधितांच्या मागणीवरून आ. विजयसिंह पंडित यांनी मंगळवार, दि. ५ मे रोजी या बाबतची बैठक घेऊन पुन्हा या प्रक्रियेला गती दिली आहे. दि. १५ मे रोजी गेवराई येथे राजस्व अभियान राबविण्यात येणार असून तोपर्यंत सर्व अतिक्रमण धारकांना पीटीआरचे वाटप करावेत असे निर्देश त्यांनी या बैठकीत दिले. राज्य शासनाने दि. २५ मार्च रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित करून निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय घेतला. नवीन शासन निर्णयातील निकषाप्रमाणे जे अतिक्रमण धारक पात्र होणार आहेत त्यांनी पुराव्यासह नगर परिषदेकडे अर्ज करण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. या प्रक्रियेसाठी विशेष कॅम्प आयोजित करून सर्व अर्ज निकाली काढण्यात येतील असा विश्वास प्रशासनाच्यावतीने उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी या बैठकीत व्यक्त केला. अनेक अतिक्रमण धारकांनी आपली नावे वगळण्यात आली असल्याच्या तक्रारी केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ज्यांची नावे यापूर्वीच्या पात्रता यादीत आहेत आणि आत्ता त्यांना पीटीआर नाकारला जात असेल तर सकारण लेखी उत्तर संबंधितांना द्यावे लागेल अशी सूचना आ. पंडित यांनी यावेळी केली. आ. विजयसिंह पंडित यांनी घेतलेल्या बैठकीमुळे गेवराई शहरातील अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर मिळण्याची स्थगित झालेली प्रक्रिया पुन्हा एकदा सुरु झाली असून अतिक्रमण धारकांना पीटीआर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हक्काच्या पीटीआर मुळे अतिक्रमण धारकांना घरकुला योजनेचा लाभ मिळणार आहे.

## जायंट्स ग्रुप ऑफ कोल्हापूर मेट्रोचा शपथविधी सोहळा संपन्न



कोल्हापूर : मानवाने मानवावर प्रेम करावे, एकमेकाचा आधार बनावे असा संदेश देणार्या मानव एकता दिनाचे औचित्य साधून जायन्ट्स फाउंडेशनच्या धेयाप्रमाणे गरीब व गरजू माणसाला माणुसकी दाखवणारे उपक्रम राबवण्याची ग्वाही देत जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन या आंतरराष्ट्रीय संस्थे अंतर्गत असलेल्या जायंट्स ग्रुप ऑफ कोल्हापूर मेट्रोच्या अध्यक्ष व संचालक मंडळाचा शपथविधी व पदग्रहन सोहळा नुकताच युनिट डायरेक्टर रवींद्र मिस्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. हा सोहळा हनुमान नगर जेष्ठ नागरिक सेवा संघ कोल्हापूर येथे झाला. अध्यक्षस्थानी हनुमान नगर जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नामदेव पाटील होते. मेट्रोचे माजी अध्यक्ष बाळासाहेब सोनुर्ले यांनी नूतन अध्यक्ष साहित्यिक बाळासाहेब तोरस्कर यांना अध्यक्षांचे मानचिन्ह बहाल केले .

## जिल्हा रुग्णालयात ‘मानवता’ जिवंत!

## सय्यद रेहान भाई बनले गरीब रुग्णांचे आधार

### रेहान भाई चा निस्वार्थ सेवेचा अनोखा आदर्श

गेवराई / प्रतिनिधी आजच्या महागाईच्या काळात जिथे उपचारासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात, तिथे जिल्हा रुग्णालयात एक तरुण निस्वार्थ भावनेने गरीब रुग्णांच्या सेवेसाठी देवदूत बनून उभा राहिला आहे. सय्यद रेहान असे या रुग्णसेवकाचे नाव असून, ते गेल्या अनेक वर्षा पासुन रुग्णालयातील गरजू रुग्णांना, विशेषत ज्यांच्या पाठीशी कुणीही नाही, अशांना स्वतःचे समजून मदत करत आहेत. रेहान यांची कामाची पद्धत अनोखी आहे. जिल्हा रुग्णालयातील अपघात विभाग असो किंवा आयसीयू, रेहान तिथे मदत करताना दिसतात. गरीब रुग्ण, ज्यांना औषधे घेण्यासाठी पैसे नाहीत, किंवा ज्यांना स्ट्रेचरवरून नेण्यासाठी कुणीही मदतनीस नाही, अशा रुग्णांसाठी रेहान आधार ठरत आहेत. अनेकदा रुग्णांना रक्ताची गरज पडल्यास रेहान स्वतः रक्तदान करतात किंवा रक्त मिळवून देण्यासाठी धावपळ करतात. रेहान म्हणतात, “रुग्णालयात येणारा प्रत्येक व्यक्ती हा दुःखी असतो. त्याला पैशांपेक्षा माणुसकीच्या आधाराची जास्त गरज असते. माझी सेवा जर कुणाचा जीव वाचवू शकत असेल किंवा वेदना कमी करू शकत असेल, तर तीच माझी खरी कमाई आहे रेहान यांच्या या कामाचे जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकाही कौतुक करतात. हॉस्पिटलमध्ये गर्दी असताना रुग्ण व्यवस्थापन असो किंवा आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना मदत करणे या कामी रेहान यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. सामाजिक बांधिलकीचा संदेश सय्यद रेहान त्याच्या रूग्ण सेवेतुन दिसत आहे यांची ही रूग्ण सेवा समाजात एक मोठा संदेश देते. सत्तेत किंवा श्रीमंतीत नसून, खरी माणुसकी ही गरजूंना मदत करण्यात आहे. रेहान यांच्या या निस्वार्थ सेवेमुळे अनेक गरीब रुग्णांना नवीन जीवनदान मिळाले आहे.सय्यद रेहान यांच्या या कार्याला सलाम! ..



## माजलगावात विकासाच्या नावाखाली उघड ‘डाका’

## सुवर्ण जयंती योजना की भ्रष्टाचाराचा बाजार?- नवीदोद्दीन सिद्दिकी

माजलगाव (प्रतिनिधी) - नगरपरिषद अंतर्गत सुरू असलेल्या ‘सुवर्ण जयंती नगरोत्थान’ योजनेतील कामांनी भ्रष्टाचाराचा कळस गाठला असल्याचा आरोप होत आहे. अभियंता, मुख्याधिकारी आणि गुत्तेदार यांनी राजकीय पाठबळाच्या जोरावर शहराच्या विकासाऐवजी जनतेच्या पैशांची उघड लूट सुरू केल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. मनूर रोड व नवीन कब्रस्तान रोडवरील कामे म्हणजे निकृष्ट दर्जाचा नमुना ठरत आहेत. रस्ते बांधून काही दिवसही होत नाहीत तोच तडे, चिरे आणि उखडलेले कॉंक्रीट दिसू लागले आहे. भर उन्हाळ्यात पाणी न मारता केलेल्या कामांमुळे रस्ते अक्षरशः फसले असून, “काम पूर्ण की फक्त बिल पूर्ण?” असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. गटारी व नाल्यांची अवस्था तर आणखीनच बिकट झाली आहे. तुटक, वाकडी-तिकडी आणि अर्धवट कामे उघडपणे केली जात आहेत. सिमेंटमध्ये भेसळ, वाळू ऐवजी डस्ट-पावडर, निकृष्ट खडी, सगळे नियम धाब्यावर बसवून काम केल्याने संपूर्ण प्रकल्पच संशयाच्या भोवऱ्यात आहे. धक्कादायक बाब म्हणजे या सगळ्याचे व्हिडिओ पुरावे समोर येऊनही संबंधित अधिकारी व पदाधिकारी गप्प असल्याने “वरपर्यंत साखळी आहे का?” असा प्रश्न शहरभर चर्चेत आहे. नगरसेवक व नगराध्यक्ष यांचेही या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संताप उफाळून आला आहे. या कामांची तात्काळ थर्ड पार्टी चौकशी, कॉंक्रीट क्यूब टेस्ट, तसेच सिमेंट, वाळू, खडी यांचे गुणवत्ता




अहवाल जाहीर करण्याची मागणी जोर धरत आहे. दोषींवर कडक कारवाई करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार सेना संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा समाजवादी पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन मुस्ताक सिद्दिकी (माजलगाव) यांनी इशारा दिला आहे की, तात्काळ कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडले जाईल. तसेच हा मुद्दा विधानसभेत मांडून सखोल चौकशी लावली जाईल, असा थेट इशाराही त्यांनी दिला असून निकृष्ट कामाचे बिल रोखून संबंधित अभियंता, मुख्याधिकारी व गुत्तेदारावर गुन्हे दाखल करण्यात यावे, नसता लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा ही महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार सेना संघटना माजलगाव तालुकाध्यक्ष तथा समाजवादी पार्टी माजी तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी दिला आहे.

## लिनेस क्लब अहमदपुरच्या नुतन अध्यक्षा सौ.शोभाताई टोंपे यांची निवड



अहमदपूरः येथील कर्तव्यदक्ष लिनेस क्लब अहमदपुरच्या वतीने सौ.शोभाताई टोंपे यांची निवड करण्यात आली. या बाबत माहिती अशी की त्यांनी अनेक उत्कृष्ट उल्लेखनीय कार्य आहेत.

गोर गरीबाचे कैवारी, इतर मागास बहुजन कल्याण आश्रम शाळेच्या सर्वेसर्वा ,तांड्या वस्तीतील लेकराला शिक्षण देणारी संस्था परिपुर्ण नावाजलेली असून , विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते.तसेच त्यांचे प्रमुख कार्य रिक्षाचालक कामगारांना गमजे ,पाणी बॉटल व त्यांचा सत्कार ,शाळेतील होतकरु मुलांना टॅबचे वाटप,अपंग व निराधार विद्यार्थ्यांना फळ व शैक्षणिक साहित्य वाटप ,अहिल्यादेवी जंयती निमित्त मुलींना टॅब वाटप,उन्हाळ्यात पक्षी व मुक्या जनावरांना पाणी पिण्यासाठी पाणवटे,अनेक पुरस्काराने सन्मानीत त्या पैकी ,गुरु गौरव ,अहिल्या रत्न, लोकमत,मानव विकास ,आदर्श प्राचार्या ,

या सर्व कार्याची दखल घेऊस त्याच्या सर्व टिमने सौ.शोभाताई टोंपे ताईची एकमताने लिनेस क्लब अध्यक्षा पदी निवड करण्यात आली.

या बद्दल शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## जिव्हाळा निवारा केंद्रात तीन दिवसीय योग प्रबोधन शिबिर

## उत्साहात संपन्न आयुषचा आरोग्य जागृतीपर आदर्श उपक्रम

बीड प्रतिनिधी :- येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील लाभार्थ्यांच्या सर्वांगीण आरोग्यवृद्धीसाठी एक प्रेरणादायी आणि आदर्शवत उपक्रम राबविण्यात आला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. मा. सतीशकुमार सोळुंके व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिव्हाळा बेघर निवारा केंद्र, बीड नगर परिषद बीड व आयुष विभाग जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ एप्रिल २०२६ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत तीन दिवसीय योग प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये जिव्हाळा निवारा केंद्रातील लाभार्थ्यांना सूक्ष्म योग क्रिया, प्राणायाम, योग शिष्टाचार यांची सविस्तर प्रात्यक्षिके देण्यात आली. विशेषतः वार्धक्य अवस्थेतील व्यक्तींसाठी उपयुक्त ठरणाऱ्या योग प्रकारांवर मार्गदर्शन करण्यात आले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्थैर्य आणि सकारात्मक जीवनदृष्टी विकसित होते असे यावेळी मान्यवरांकडून सांगण्यात आले.



सदरील कार्यक्रमासाठी योगशिक्षक श्री विष्णुदास बियाणी, योग प्रशिक्षक श्री प्रशांत रावसाहेब कुलकर्णी, श्रीमती अविद्या तेलुरे, शेख फजलूर रहमान, हनीफ खान चांद खान पठाण व श्री लिमकर यांनी लाभार्थ्यांना प्रत्यक्ष योगाभ्यासाचे प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे लाभार्थ्यांमध्ये योगाविषयी उत्साह आणि जागरूकता निर्माण झाली.

### शरीर संपत्ती हीच खरी संपत्ती - वैभव स्वामी

आयुष्यभर ज्यांच्या भल्यासाठी एक वेळ उपाशी राहून संपत्ती उभी केली त्यांनी वय झाल्यानंतर तुम्हाला घराबाहेर काढले. रक्ताच्या नात्यांनी नाकारले पण जिव्हाळा बेघर निवारा केंद्राने तुम्हाला आपले केले.आता या वयात शरीर हीच आपली संपत्ती आहे हे लक्षात घ्या. यापुढचे आयुष्य निरोगी, आनंदी कसे राहील याकडे लक्ष द्या, आयुष प्रकल्प अंतर्गत तज्ञ मंडळींनी मागील तीन दिवसापासून आपल्याला निरोगी स्वास्थासाठी अनमोल मार्गदर्शन केले. त्यानुसार आपण दररोज नियमित व्यायाम करावा आणि आयुष विभागाने देखील या बेघर लाभार्थ्यांसाठी सातत्याने या ठिकाणी शिबिराचे आयोजन करून एक सामाजिक दायित्व स्वीकारावे असे आवाहन पत्रकार वैभव स्वामी यांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत वैद्य, प्रास्ताविक राजु वंजारे यांनी तर आभार प्रदर्शन यश वंजारे यांनी केले तर यशस्वीतेसाठी छाया सरोदे यांच्यासह अनेकांनी सहकार्य केले

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक माननीय श्री अभिजीत वैद्य व श्री राजू वंजारे तसेच छायाताई सरोदे आणि वैभव स्वामी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजयकुमार सोळंके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण, मा. निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) लक्ष्मीकांत तांदळे, मा. जिल्हा आयुष अधिकारी डॉ. पुरुषोत्तम पिंगळे, सहाय्यक जिल्हा आयुष अधिकारी डॉ. आनंद कुलकर्णी,जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक आयुष श्रीमती आकांक्षा शिंदे, जिल्हा आयुष सल्लागार डॉ. अजयकुमार राख व आयुष विभाग जिल्हा रुग्णालय बीड येथील सर्व वैद्यकीय अधिकारी यांचे सहकार्य लाभले. हा उपक्रम केवळ आरोग्य संवर्धनापुरता मर्यादित न राहता, समाजातील वंचित घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडविण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. ‘आरोग्य हेच खरे धन’ हा संदेश प्रभावीपणे पोहोचवणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com